जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २०६ दिनांक -०५/०४/२०२४**

युनिट ५ गुन्हे शाखा,पुणे शहर

## तडीपार गुंडास केले जेरबंद

गुन्हे शाखेचे युनिट ५ च्या कार्यक्षेत्रामध्ये लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने गुन्हेगारांकडुन कोणतेही अनुचित प्रकार घडु नये यासाठी युनिट ५,चे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांनी युनिटकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे वेगवेगळया टिम तयार करुन त्यांना योग्य ती कारवाई करणेसाठी सुचना निर्गमित केलेल्या होत्या.

दि.०३/०४/२०२४ रोजी युनिटकडील पोलीस अंमलदार पोलीस अंमलदार अकबर शेख यांना बातमी मिळाली की, पुणे शहर व पुणे जिल्हयातुन तडीपार केलेला गुंड आदित्य उर्फ दाद्या शिंदे याचेकडे धारदार शस्त्र असुन तो कोणतातरी गंभीर स्वरुपाचा गुन्हा करण्याचे उद्देशाने माळवाडी, हडपसर या परिसरात वावरत आहे. वगैरे माहिती मिळाली त्याप्रमाणे तडीपार आरोपी नामे **आदित्य उर्फ दाद्या बबन शिंदे, वय-२४ वर्षे, रा. कामठेवस्ती, माळवाडी हडपसर, पुणे** यास पकडण्यासाठी योग्य त्या पध्दतीने सापळा लाऊन त्यास शिताफीने पकडुन ताब्यात घेतले. त्यावेळी त्याचे कब्जात एक धारदार तलवार ही स्वतःची दहशत निर्माण करणेकामी वापरत असल्याचे आढळुन आले. म्हणुन त्याचेविरुध्द भारतीय हत्यार कायदा कलम ४ (२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१)(३) सह १३५ आणि १४२ प्रमाणे कारवाई केली. **नमुद आरोपी रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्यास पुणे शहर व पुणे जिल्हयातून २ वर्षाकरीता तडीपार केले आहे**. नमुद तडीपार आरोपी विरुध्द हडपसर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास चालु आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उपायुक्त,गुन्हे,श्री.अमोल झेंडे, मा.सहा.पोलीस आयुक्त, श्री.सतिश गोवेकर,यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विश्वजीत काईंगडे, पोलीस अंमलदार विनोद शिवले, दया शेगर, शशिकांत नाळे, दाऊद सय्यद, पांडुरंग कांबळे, राहुल ढमढेरे यांनी केलेली आहे.